# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## पुनरूत्थान काळातील पाचवा रविवार

### सकाळची प्रार्थना

*महत्वाची सूचना ः सदर प्रार्थना ही ख्रिस्तसभेची अधिकृत प्रार्थना आहे. कोविड १९ चा प्रादुर्भाव लक्षात घेता ही प्रार्थना आपण आपल्या कुटुंबात एकत्रित करावी ही नम्र विनंती.*

**चरण:** प्रभो, आमचे ओठ उघड.
प्रतिसाद: आणि आम्ही तुझ्या नामाचे स्तवन करू.

**आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत** : प्रभू खरोखर उठला आहे, आल्लेलुया.

स्तोत्र २४

पृथ्वी व तिच्यावरील सर्व काही परमेश्वराचे आहे;
जग व त्यात राहणारे परमेश्वराचे आहेत.
कारण त्यानेच सागरावर तिचा पाया घातला,
त्यानेच जलप्रवाहांवर तिला स्थिर केले. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

परमेश्वराच्या डोंगरावर कोण चढेल?
त्याच्या पवित्र स्थानात कोण उभा राहील?
ज्याचे हात स्वच्छ आहेत आणि ज्याचे मन शुद्ध आहे,
जो आपले चित्त असत्याकडे लावीत नाही,
व कपटाने शपथ वाहत नाही तो. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

त्याला परमेश्वरापासून आशीर्वाद मिळेल,
आपल्या उद्धारक देवाच्या हातून तो नीतिमान ठरेल.
त्याला शरण जाणारे हेच लोक होत;
हे याकोबाच्या देवा,
तुझ्या  दर्शनासाठी उत्सुक असलेले ते हेच. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

अहो वेशींनो, आपल्या कमानी उंच करा;
पुरातन द्वारांनो, उंच व्हा;

म्हणजे प्रतापशाली राजा आत येईल. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

हा प्रतापशाली राजा कोण?
बलवान व पराक्रमी परमेश्वर,
युद्धांत पराक्रमी परमेश्वर तोच, आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

अहो वेशींनो, आपल्या कमानी उंच करा;
पुरातन द्वारांनो, उंच व्हा;
म्हणजे प्रतापशाली राजा आत येईल. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

हा प्रतापशाली राजा कोण?
सेनाधीश परमेश्वर,
हाच प्रतापशाली राजा. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत** : प्रभू खरोखर उठला आहे, आल्लेलुया.

**गीत** ः इस्टर गीत

**प्रतिगीत १:** जो कोणी तान्हेला आहे त्याने यावे आणि जीवनाचे पाणी प्यावे, ज्यांची इच्छा आहे अशासाठी ते विनामूल्य आहे.

**स्तोत्र ६३: २ - ९**

**हे** देवा, तू माझा देव आहेस;
मी आस्थेने तुझा शोध करीन;
शुष्क, रूक्ष व निर्जल प्रदेशात माझा जीव तुझ्यासाठी तान्हेला झाला आहे,
माझ्या देहालाही तुझी उत्कंठा लागली आहे.
अशाप्रकारे तुझे बळ व वैभव पाहण्यास
पवित्रस्थानी मी तुझ्याकडे दृष्टी लाविली आहे.

**तु**झे वात्सल्य जीवनाहून उत्तम आहे;
माझे ओठ तुझे स्तवन करितील.
मी जिवंत आहे तोपर्यंत तुझा धन्यवाद असाच करीन;
तुझ्या नावाने मी आपले हात उभारीन.

मज्जेने व मेदाने व्हावा तसा माझा जीव तृप्त होईल,
आणि माझे मुख हर्षभरित होऊन तुझे स्तवन करील.

**मी** रात्री आपल्या अंथरूणावर पडून तुझे स्मरण करतो,
व प्रहरोप्रहरी तुझे ध्यान करीत असतो.
कारण तू माझे साहाय्य होत आला आहेस,
म्हणून तुझ्या पंखांच्या सावलीत मी आनंद करीन.
माझ्या जिवाने तुझी कास धरली आहे;
तुझा उजवा हात मला सांभाळून धरतो;

**पि**ता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

प्रतिगीत १: जो कोणी तान्हेला आहे त्याने यावे आणि जीवनाचे पाणी प्यावे, ज्यांची इच्छा आहे अशासाठी ते विनामूल्य आहे.

***********

प्रतिगीत २: आकाश, पृथ्वीच्या आणि समुद्र आणि प्रत्येक ओहळाच्या निर्माणकर्त्या परमेश्वराची स्तुती करा, आल्लेलुया.

काव्य - तीन युवकांचे गीत: ३५ - ६८

**प्र**भूच्या साऱ्या कृत्यांनो, त्याचा धन्यवाद गा,
त्याची स्तवने गा आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
तारामंडळांनो प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

**प्र**भूच्या दूतांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
मेघातील जलांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
साऱ्या सत्तांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

**हे** सूर्य आणि चंद्र, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

आकाशातील ताऱ्यांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
जलधारांनो आणि दवबिंदूनो, प्रभूचा धन्यवाद गा.
त्याची स्तवने गा आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

वाऱ्या वायुंनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
अग्नी आणि उष्णते, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
हिवाळयातील थंडी आणि उन्हाळयातील उष्णते, प्रभूचा धन्यवाद गा,
त्याची स्तवने गा आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

हिम आणि दवबिंदूनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
बर्फ आणि थंडी, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
ओसकणांनो आणि हिमांनो, प्रभूचा धन्यवाद गा. त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

रात्रींनो आणि दिवसांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
उजेड आणि अंधार, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
मेघांनो आणि विजांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

पृथ्वीने प्रभूचा धन्यवाद गावा, त्याची स्तवने गावी
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करावी.

पर्वतांनो आणि टेकडयांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
पृथ्वीवर वाढणाऱ्या सर्व वनस्पतींनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
अहो झऱ्यांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

सागरांनो आणि नद्यांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
देवमाशांनो आणि जलचरांनो, प्रभूचा धन्यवाद गा. त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
हवेत संचारणाऱ्या सर्व पक्षांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
पशूंनो आणि गुरांनो, प्रभूचा धन्यवाद गा. त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

अहो मानवपुत्रांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

अहो इस्त्राएली लोकांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
प्रभूच्या पुरोहितांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
प्रभूच्या सेवकांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

नीतिमानांच्या आत्म्यांनो आणि जीवांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
पवित्र व विनयशील जनांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
हन्नानिया, अझारिया आणि मिखाएल प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

प्रभू चांगला आहे म्हणून त्याचे आभार माना
कारण त्याची दया सनातन आहे.
प्रभू देवाधिदेव यांची उपासना करणाऱ्यांनो,
त्याचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि त्याचे आभार माना कारण त्याची दया सनातन आहे.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्म्याची स्तुती करू या.
तुझाच सर्वोच्च गौरव आणि स्तुती सदासर्वकाळ होवो.
हे प्रभू, स्वर्गात तू धन्यवादित होवो.

तुझाच सर्वोच्च गौरव आणि स्तुती सदासर्वकाळ होवो.

प्रतिगीत २: आकाश, पृथ्वीच्या आणि समुद्र आणि प्रत्येक ओहळाच्या निर्माणकर्त्या परमेश्वराची स्तुती करा, आल्लेलुया.

***********

प्रतिगीत ३: संतांना आनंदाने स्तुती करू दे, आल्लेलुया.

स्तोत्र: १४९

परमेशाचे स्तवन करा,
नवे गीत गाऊन परमेश्वराचे गुणगान करा.
भक्तांच्या मंडळीत त्याचे स्तोत्र गा.
इस्राएल आपल्या निर्माणकर्त्याच्या ठायी आनंद करो;
सियोनेची मुले आपल्या राजाच्या ठायी उल्लास पावोत.
ती नृत्य करीत त्याच्या नावाचे स्तवन करोत.
डफ व वीणा ह्यावर त्याला स्तोत्रे गावोत.

कारण परमेश्वर आपल्या लोकांवर संतुष्ट आहे;
तो दीनांना तारणाने सुशोभित करितो.
भक्त गौरवामुळे उल्लासोत;
ते आपल्या अंथरूणांवरून हर्षघोष करोत.
परमेश्वराची परमश्रेष्ठ स्तुती त्यांच्या कंठी असो;
दुधारी तरवार त्यांच्या हाती असो;

तिच्या योगे राष्ट्रांचा सूड त्यांनी उगवावा
आणि लोकांना शासन करावे.
त्यांच्या राजांना साखळदंडांनी बांधावे
आणि त्यांच्या सरदारांना लोखंडी बेडया घालाव्या.
लिहून ठेविलेला निवाडा त्यांच्यावर बजवावा,
हे त्याच्या सर्व भक्तांना भूषण होईल.
परमेशाचे स्तवन करा.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

प्रतिगीत ३: संतांना आनंदाने स्तुती करू दे, आल्लेलुया.

## शास्त्रवाचन

**प्रे.कृ. १०:४० - ४३**

त्याला देवाने तिसऱ्या दिवशी उठविले व त्याने प्रगट व्हावे असे केले. तरी हे प्रकटीकरण सर्व लोकांना नव्हे, पण जे साक्षी देवाने पूर्वी निवडले त्या आम्हाला केले; त्या आम्ही तो मेलेल्यांतून उठल्यानंतर त्याच्याबरोबर खाणेपिणे केले. त्याने आम्हाला अशी आज्ञा केली की, लोकांस उपदेश करा व अशी साक्ष द्या की, देवाने नेमलेला असा जिवंतांचा व मेलेल्यांचा न्यायाधीश तो हाच आहे. त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने पापांची क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात.

## लघु प्रतिसाद

प्रतिसाद: हे ख्रिस्ता, जिवंत देवाच्या पुत्रा, आम्हावर दया कर, आल्लेलुया, आल्लेलुया.

प्रतिसाद: हे ख्रिस्ता, जिवंत देवाच्या पुत्रा, आम्हावर दया कर, आल्लेलुया, आल्लेलुया.

चरण: तू मरणातून जिवंत झाला आहेस.

प्रतिसाद: हे ख्रिस्ता, जिवंत देवाच्या पुत्रा, आम्हावर दया कर, आल्लेलुया, आल्लेलुया.

त्रैक्य स्तुती: पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो.

प्रतिसाद: हे ख्रिस्ता, जिवंत देवाच्या पुत्रा, आम्हावर दया कर, आल्लेलुया, आल्लेलुया.

**जखऱ्याच्या स्तोत्राचे प्रतिगीत :** प्रभू म्हणतो, “जो माझ्यामध्ये राहतो व मी ज्याच्यामध्ये राहतो तो पुष्कळ फळ देता”, आल्लेलुया.

जखऱ्याचे स्तोत्र

**इ**स्त्राएलचा देव प्रभू धन्यवादित असो,
कारण त्याने आपल्या लोकांची भेट घेऊन
त्यांची ‘खंडणी भरून सुटका’ केली आहे;

**आ**णि आपल्यासाठी त्याने आपला दास ‘दावीद'
ह्याच्या घराण्यात ‘बलवान् उद्धारक प्रस्थापित केला आहे;
हे त्याने युगाच्या प्रारंभापासून
आपल्या पवित्र संदेष्टयांच्या मुखाद्वारे सांगितले होते;’

**म्ह**णजे आपल्या ‘शत्रूंच्या’ व आपला ‘द्वेष करणाऱ्या’
सर्वांच्या ‘हातून’ सुटका करावी;
अशासाठी की, ‘आपल्या पूर्वजांवर’ त्याने ‘दया’ करावी.

आणि त्यानें 'आपला' पवित्र 'करार' म्हणजे जी शपथ
आपला पूर्वज 'अब्राहाम ह्याच्याशी त्याने वाहिली', ती 'स्मरावी',

**ती** अशी की, तुम्ही आपल्या शत्रूंच्या हातून सुटून
माझ्यासमोर पवित्रतेने व नीतीने
आयुष्यभर माझी सेवा निर्भयपणे कराल, असे मी करीन.

**आ**णि हे बाळका, तुला परात्पराचा संदेष्टा म्हणतील,
कारण 'प्रभूचे मार्ग सिद्ध करण्याकरिता तू त्याच्यापुढे' चालशील;

**ह्या**साठी की, त्याच्या लोकांस त्यांच्या पापांच्या क्षमेने तारणाचा अनुभव द्यावा.
आपल्या देवाच्या परम दयेने हे झाले आहे;
तिच्या योगे उदयप्रकाश वरून आमच्याकडे येईल.

'**ह्या**साठी की, त्याने अंधारात व मृत्युच्छायेत बसलेल्यांना प्रकाश द्यावा',
आणि आमचे पाय शांतीच्या मार्गी लावावे.

**पि**ता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**जखऱ्याच्या स्तोत्राचे प्रतिगीत :** प्रभू म्हणतो, "जो माझ्यामध्ये राहतो व मी ज्याच्यामध्ये राहतो तो पुष्कळ फळ देता", आल्लेलुया.

## विनंत्या

प्रतिसाद: हे ख्रिस्ता, आमच्या जीवना, आमचे तारण कर.

**जी**वनाचा स्वामी असलेल्या ख्रिस्ताकडे आपण प्रार्थना करू या. देवाने त्याला मरणातून उठविले आणि तो आपल्याही त्याच्या सामर्थ्याने मरणातून जिवंत करणार आहे. प्रतिसाद: हे ख्रिस्ता, आमच्या जीवना, आमचे तारण कर.

**हे** ख्रिस्ता, तू सर्व प्रकारचा अंधकार दूर करतोस आणि लोकांना पावित्र्याकडे आकर्षून घेतोस. - आजच्या दिवशी त्याला स्तुतीचा जिवंत यज्ञ अर्पण करू या. प्रतिसाद: हे ख्रिस्ता, आमच्या जीवना, आमचे तारण कर.

**हे** प्रभो, तू दुःखसहनाचा आणि कुसाचा मार्ग पत्करलास - आम्हाला तुझ्यासह मरण पत्करण्यास व पुन्हा उठण्यास सहाय्य कर. प्रतिसाद: हे ख्रिस्ता, आमच्या जीवना, आमचे तारण कर.

**हे** येशू, तू आमचा स्वामी आणि आमचा बंधू आहेस. परमेश्वर, आपला पिता ह्याची सेवा करण्यासाठी तू आम्हाला 'याजकराज्य' असे केले आहेस. - आम्ही आनंदाने तुला स्तुतीचा यज्ञ अर्पण करावा असे कर. प्रतिसाद: हे ख्रिस्ता, आमच्या जीवना, आमचे तारण कर.

**हे** वैभवशाली राजा, आम्ही तुझ्या पुनरागमनाच्या दिवसाची वाट पाहात आहोत. - आम्ही तुला समोरासमोर पाहावे आणि तुझ्या वैभवाचे भागीदार व्हावे अशी कृपा आम्हाला दे. प्रतिसाद: हे ख्रिस्ता, आमच्या जीवना, आमचे तारण कर.

**आ**मच्या स्वर्गीय बापा...

## समारोपाची प्रार्थना

हे प्रभो, आमच्या स्वर्गीय बापा, आम्हाकडे आपली दयादृष्टी वळव. तू आम्हाला पापमुक्त करतोस व ख्रिस्ताठायी तुझी मुले बनवतोस. आम्हाला परिपूर्ण स्वातंत्र्य दे व तू अभिवचन दिलेल्या वतनाचा स्वीकार करण्यास पात्र कर. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात, सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

## समारोप विधी:

प्रभू आम्हाला आशीर्वाद देवो, सर्व वाईटांपासून आम्हाला सुरक्षित ठेवो आणि आम्हाला सार्वकालिक जीवनाकडे नेवो.

प्रतिसाद: आमेन.